ज्ञान शांति मैत्री

महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा

(संसद द्वारा पारित अधिनियम 1997, क्रमांक 3 के अंतर्गत स्थापित केंद्रीय विश्वविद्यालय)

जनसंपर्क कार्यालय

PUBLIC RELATIONS OFFICE

आज़ादी का अमृत महोत्सव

हिंदी पत्रकारिता के दो सौ वर्ष : विरासत, सरोकार और विकसित भारत का संकल्प विषय पर राष्ट्रीय संगोष्ठी का हुआ समापन

• पत्रकारिता में साहित्य, चिंतन-मनन का घटता स्थान चिंतनीय : कुलपति प्रो. कुमुद शर्मा

• खुशहाली से ही पूरा होगा विकसित भारत का संकल्प : संपादक प्रकाश दुबे

• सम्यक, सकारात्मक पत्रकारिता हमारी विरासत है : प्रो. राम मोहन पाठक

वर्धा, 06 नवंबर 2026 : महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय में 'हिंदी पत्रकारिता के दो सौ वर्ष : विरासत, सरोकार और विकसित भारत का संकल्प' विषय पर आयोजित दो दिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी का समापन गुरुवार, 5 नवंबर को हुआ। समारोह की अध्यक्षता विश्वविद्यालय की कुलपति प्रो. कुमुद शर्मा ने की। इस अवसर पर मुख्य अतिथि के रूप में दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, चेन्नई के पूर्व कुलपति प्रो. राम मोहन पाठक तथा सारस्वत अतिथि के रूप में दैनिक भास्कर, नागपुर के समूह संपादक प्रकाश दुबे ने संबोधित किया।



अध्यक्षीय वक्तव्य में कुलपति प्रो. कुमुद शर्मा ने कहा कि 1991 के आर्थिक उदारीकरण के बाद पत्रकारिता अत्यंत तेजी से बदल रही है। वर्तमान में पत्रकारिता में साहित्य और चिंतन-मनन से जुड़े मुद्दे गायब हो रहे हैं। साहित्यिक संपादक का दौर चला गया है, यहीं कारण है कि अनेक साहित्यिक पत्रिकाएं बंद हो गई है। वैश्विक मीडिया के आने के कारण मीडिया ग्राहक केंद्रित बन गया है। उन्होंने कहा कि सोशल मीडिया ने संचार का नया चेहरा प्रस्तुत किया है और दिवाली, होली, तीज जैसे त्यौहार की संस्कृति को भी

भुनाया जा रहा है। इससे एक तरह का डिजिटल साम्राज्यवाद आया है। सोशल मीडिया ने मनोविज्ञान और वाणिज्य का ऐसा संबंध बनाया है जिससे मादक पदार्थ की तरह इसकी नशा युवा पीढ़ी में फैल रही है और इससे बचाव के लिए मोबाइल नशा मुक्ति केंद्र खोले जा रहे हैं। उन्होंने कहा कि हमें सुरक्षित भविष्य के लिए सांस्कृतिक परंपराओं को लेकर विकसित भारत का मार्गक्रमण करना होगा।



संपादक प्रकाश दुबे ने विकसित भारत की संकल्पना पर विचार रखते हुए कहा कि केवल आर्थिक प्रगति नहीं, बल्कि नागरिकों की खुशहाली, बेहतर शिक्षा और रोजगार के अवसर सुनिश्चित करना भी इसकी संकल्पना में होने चाहिए और खुशहाली के लिए व्यक्तिगत स्वाधीनता की रक्षा भी होनी चाहिए। उनका कहना था कि विकास पत्रकारिता का उद्देश्य केवल सरकारी विज्ञप्तियों का प्रकाशन करना नहीं, बल्कि विकास से जुड़े मुद्दों को उठाना, कमियों को सामने लाना और सरकार को रचनात्मक सुझाव देना भी है।

प्रो. राममोहन पाठक ने भारतीय पत्रकारिता की परंपरा, मूल सरोकारों और राष्ट्र के विकास में उसकी भूमिका पर विचार रखे। उन्होंने कहा कि परंपरा दो पैरों पर चलती है और मनुष्य का जीवन भावनाओं का संसार है। पत्रकारिता की मूल आत्मा उसके सरोकारों में निहित है। पत्रकारिता केवल घटनाओं की सूचना देने भर तक सीमित न रहकर राष्ट्र के महत्वपूर्ण मुद्दों और जनहित के विषयों को प्राथमिकता देने की व्यापक भावना की होनी चाहिए। उनका कहना था कि बदलते परिदृश्य में बुद्ध के अष्टांगिक मार्ग का अनुसरण करते हुए सम्यक रूप से पत्रकारिता को सनातन, निरंतर और नित्य नूतन बनाए रखना चाहिए।



समापन सत्र में स्वागत वक्तव्य प्रो. के. बालराजू ने दिया। कार्यक्रम का संचालन डॉ. राजेश लेहकपुरे ने किया। कार्यक्रम का प्रतिवेदन डॉ. रेणु सिंह ने प्रस्तुत किया तथा जनसंपर्क अधिकारी बी.एस. मिरगे ने धन्यवाद ज्ञापित किया। अतिथियों द्वारा मीडिया समय का विमोचन इस अवसर पर किया गया। कार्यक्रम का प्रारंभ कुलगीत से तथा समापन राष्ट्र गीत व राष्ट्र गान से किया गया। इस अवसर पर विश्वविद्यालय के शिक्षक, शोधार्थी एवं विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित रहे।

मराठी :

‘हिंदी पत्रकारितेची दोनशे वर्षे : वारसा, सरोकार आणि विकसित भारताचा संकल्प’ या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप

• पत्रकारितेतील साहित्य आणि चिंतन-मननाचे घटते स्थान चिंताजनक : कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा

• समृद्धी आणि आनंदी जीवनातूनच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल : संपादक प्रकाश दुबे

• सम्यक आणि सकारात्मक पत्रकारिता हाच आपला वारसा : प्रो. राममोहन पाठक

वर्धा, दि. ६ नोव्हेंबर २०२६ : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात ‘हिंदी पत्रकारितेची दोनशे वर्षे : वारसा, सरोकार आणि विकसित भारताचा संकल्प’ या विषयावर आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, चेन्नईचे माजी कुलगुरू प्रो. राममोहन पाठक, तर सन्माननीय अतिथी म्हणून दैनिक भास्कर, नागपूरचे समूह संपादक प्रकाश दुबे उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा म्हणाल्या १९९१ मधील आर्थिक उदारीकरणानंतर पत्रकारितेच्या क्षेत्रात अत्यंत वेगाने बदल झाले आहेत. सध्याच्या पत्रकारितेत साहित्य आणि चिंतन-मननाशी संबंधित विषयांना मिळणारे स्थान कमी होत चालले आहे, ही चिंतेची बाब आहे. साहित्यिक संपादकांचा काळ मागे पडला असून, त्यामुळे अनेक साहित्यिक नियतकालिके बंद पडली आहेत. जागतिक माध्यमांच्या आगमनामुळे माध्यमे ग्राहककेंद्रित झाली आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, सोशल मीडियाने संवादाचे नवे स्वरूप निर्माण केले आहे. दिवाळी, होळी, तीज यांसारख्या सण-उत्सवांच्या संस्कृतीचेही व्यावसायिकीकरण केले जात आहे. यातून एका प्रकारचा डिजिटल साम्राज्यवाद निर्माण झाला आहे. सोशल मीडियाने मानसशास्त्र आणि व्यापार यांचा असा संबंध निर्माण केला आहे की, त्याचे व्यसन मादक पदार्थांच्या व्यसनाप्रमाणे तरुण पिढीत पसरत आहे. या

व्यसनापासून मुक्तीसाठी मोबाईल व्यसनमुक्ती केंद्रे सुरू केली जात आहेत. सुरक्षित भविष्यासाठी सांस्कृतिक परंपरांचे जतन करत विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संपादक प्रकाश दुबे यांनी विकसित भारताच्या संकल्पनेवर विचार मांडताना सांगितले की, विकसित भारत म्हणजे केवळ आर्थिक प्रगती नव्हे, तर नागरिकांचे आनंदी आणि समाधानी जीवन, दर्जेदार शिक्षण तसेच रोजगाराच्या संधी यांचीही त्यात हमी असली पाहिजे. नागरिकांच्या आनंदी जीवनासाठी वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विकास पत्रकारितेचे उद्दिष्ट केवळ सरकारी प्रसिद्धिपत्रके प्रकाशित करणे एवढेच नसावे, तर विकासाशी संबंधित प्रश्न उपस्थित करणे, त्रुटी समोर आणणे आणि सरकारला विधायक सूचना देणे हेही पत्रकारितेचे महत्त्वाचे कार्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रो. राममोहन पाठक यांनी भारतीय पत्रकारितेची परंपरा, तिचे मूलभूत सरोकार आणि राष्ट्राच्या विकासातील तिची भूमिका यावर विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, परंपरा दोन पायांवर चालते आणि मानवी जीवन हे भावनांचे विश्व आहे. पत्रकारितेचा खरा आत्मा तिच्या सामाजिक सरोकारांमध्ये दडलेला आहे. पत्रकारिता केवळ घटनांची माहिती देण्यापुरती मर्यादित न राहता राष्ट्रासमोरील महत्त्वाचे प्रश्न आणि जनहिताच्या विषयांना प्राधान्य देणारी व्यापक भूमिका तिने स्वीकारली पाहिजे. बदलत्या परिस्थितीत भगवान बुद्धांच्या अष्टांगिक मार्गाचे अनुसरण करून पत्रकारितेला सम्यक, शाश्वत, निरंतर आणि नवनवीन स्वरूपात पुढे नेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

स्वागतपर भाषण प्रो. के. बालराजू यांनी तर कार्यक्रमाचे संचालन डॉ. राजेश लेहकपुरे यांनी केले. चर्चासत्राचा अहवाल डॉ. रेणू सिंह यांनी सादर केला, तर विश्वविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे यांनी आभार मानले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'मीडिया समय' चे विमोचन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात विश्वविद्यालयाच्या कुलगीताने झाली, तर समारोप राष्ट्रीयगीत आणि राष्ट्रगीताने करण्यात आला. यावेळी विश्वविद्यालयातील प्राध्यापक, शोधार्थी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नमस्कार! मा. संपादक/संवाददाता
महोदय, कृपया संलग्न समाचार को प्रकाशित कर अनुगृहीत करने का कष्ट करें।
सादर धन्यवाद।